# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक 28.01.2013 (का.प.क्र.25) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 28.01.2013 (का.प.क्र.25) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
09. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
10. स. श्री. खान अक्रम करीम खान
11. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
12. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
13. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

श्री.बाळुलाल गुजर :वार्डात बोअरबाबत प्रशासनास वारंवार विनंती केलेली आहे परंतु कोणतीही कार्यवाही केली जात नाही.

श्री.समीर राजुरकर :बोअरबाबत नियमावली सांगण्यात यावी. लोकप्रतिनिधींच्या निधीतुन बोअर करण्याच्या विषयास प्रशासनाकडुन मंजूरी मिळत नाही.

मा.सभापती :खाजगी मालमत्ता सोडुन कुठेही बोअरींग करता येते.

श्री.समीर राजुरकर :अनुदानित शाळाही सार्वजनिक प्रापर्टी आहे. खाजगी मालमत्ता नाही. तेव्हा बोअरींग ही पब्लीक प्रापर्टी होते.

कार्यकारी अभियंता (पा/पू):सात वेळेस टेंडर काढुनही प्रतिसाद मिळालेला नाही. महापालिकेच्या मालमत्तावर महापालिकेच्या फंडातुन,स्वेच्छेतुन बोअर मारण्यास काहीच अडचण नाही. एखाद्या व्यक्तीने भाडयाने शाळा घेतलेली असेल त्या ठिकाणी बोअर मारता येणार नाही.

श्री.बाळुलाल गुजर :वार्डात स्लम एरियामध्ये जागा पुरेशा प्रमाणात आहे. संजय नगर भागात नागरीकांना पिण्यासाठी पाणी नाही.

मा.सभापती :टेंडर न भरण्याचे कारण काय? कोटेशन मागविण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता (पा/पू) :प्रयत्न केलेला आहे परंतु पेमेंट वेळेवर न मिळण्याचे कारण आहे. राज्य शासनाकडे पाण्यासाठी 3 कोटीच्या अनुदानाची मागणी करण्यात आली होती. परंतु अनुदान मिळालेले नाही. बोअरींगच्या कंत्राटदारांना बोलावुन विचारणा करण्यात येईल.**

**श्री.गिरजाराम हळनोर :महानगरपालिकेत आलेला पैसा कुठे जात आहे? गुत्तेदाराला जर पेमेंट मिळत असेलतर ही बदनामी कशासाठी? महाराष्ट्र शासनाने टँकरचा प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्याचे आदेश दिलेले आहेत. विहीरी अधिगृहित केलेल्या आहेत. महानगरपालिकेची पाण्याबाबतची स्थिती शासनासमोर स.पदाधिकारी आणि स.नगरसेवकांनी प्रत्यक्ष भेटुन परिस्थिती सांगण्यात यावी. शहरातील विहीरी स्वच्छ करून अधिगृहीत करण्यात याव्या. जायकवाडी येथील गाळ काढण्यात आला पाहिजे बोअर मारल्यागेल्या पाहिजे यासाठी शासनाकडे विशेष पाठपुरावा करून निधी आणणे आवश्यक आहे.**

**श्री.बाळासाहेब मुंडे :खाजगी बोअरही अधिगृहीत करू शकतो. वार्डात खाजगी व्यक्ती बोअरचे पाणी 35 रूपये ड्रम या प्रमाणे विकण्यात येते. सदरील बोअर अधिगृहीत करण्यात यावे.**

**कार्यकारी अभियंता पा/पू:खाजगी व्यक्ती खाजगी बोअर देण्यास तयार असेल तर तो घेण्यात येईल.**

**मा.सभापती :याबाबत प्रशासनाने संबधीत व्यक्तीशी संपर्क साधुन कार्यवाही करावी.**

**कार्यकारी अभियंता पा/पू:पाण्याच्या पेमेंटला प्राथमिकता हवी.**

**श्री.बाळासाहेब मुंडे :दुष्काळ परिस्थिती आहे. पाण्याच्या पेमेंटला प्राधान्य दिले पाहिजे.**

**श्री.रेणुकादास वैद्य :सदरची जबाबदारी प्रशासनाची आहे. नागरीकांना सुविधा मिळायला हवी. पिण्याच्या पाण्याची सोय झाली पाहिजे. टँकर, बोअरींग, वॉटरलाईन लिकेजचे प्राधान्यक्रमाने पेमेंट अदा करण्यात यावे.**

**मा.सभापती :बोअरींग संबधी कंत्राटदारांना बोलावुन निर्णय घेण्यात यावा. खाजगी व्यक्ती विहीर देण्यास तयार आहे. प्रशासनाने खुलासा करावा**

**कार्य.अभि.(श्री.कोल्हे) : सदरील विहीर नाल्याच्या बाजुला असुन विहीरीचे पाणी पिण्यासाठी योग्य नाही.**

**मा.सभापती :सदरील विहीरीचे पाणी पिण्यासाठी न वापरता इतर ठिकाणी जसे गार्डनमध्ये, इतर ठिकाणी व वापरयोग्य ठिकाणी विहीरीचे पाणी वापरता येईल. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.**

**श्री.बाळासाहेब मुंडे :प्रशासनाने पाण्याचे योग्यरितीने नियोजन करावे. पाण्याचे पेमेंट लवकरात लवकर देण्यात यावे.**

**श्री.समीर राजुरकर :समांतर जलवाहिनी टाकण्यास अजुन एक ते दिड महिन्याचा कालावधी आहे.**

**मा.सभापती :बोअरींगबाबत संबधीत कंत्राटदार यांना बोलावुन समस्या सोडविण्यात येईल तसेच नगरसेवक स्वेच्छा निधीतुन बोअरींग बाबत प्रस्ताव मांडत असेल तर त्यास प्रशासनाने कार्यवाही करावी.**

**श्री.समीर राजुरकर** :पाणीपुरठयाची जबाबदारी निश्चीत करण्यात यावी. 15 वार्डात (धावणी मोहल्ला,गुलमंडी, औरंगपुरा,काझीवाडा) आठ दिवसांच्या आड पाणी देण्यात येते. शेडयुल संभाळण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. टॅक्स पे वार्डामध्ये नऊ दिवसांनंतर पाण्याचा सप्लाय केला जातो.

**कार्य.अभियंता(श्री.कोल्हे)**:जायकवाडी येथे विद्युतची समस्या निर्माण झाल्यामुळे 24 तासाचा शटडाऊन झाला होता. दुसऱ्या दिवशी परत सहा तासाचा गॅप झाला. त्यामुळे सप्लायमध्ये व्यत्याय झाला होता.

**श्री.समीर राजुरकर** :नऊ दिवस पाणी दिले नाही तर त्यांना टँकर देण्यात यावे. 2400 रूपये पाणीपट्टी आकारण्यात आलेली आहे. दोन दिवसांआड पाणी देण्यात येते. परंतु नऊ दिवस पाणी न देणे हे योग्य नाही. वार्डातील कुठल्याही नागरीकाला विचारणा करण्यात यावी. नऊ दिवस वार्डांना पाणी मिळालेले नाही. सन 2013 पर्यंत पाणीपट्टी अदा केलेली आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने सदरील प्रश्न प्राधान्याने सोडविला पाहिजे.

**श्री.समीर राजुरकर** :कोटलाच्या टाकीवर नागरीक जाऊन पाण्यासाठी विनंती करतात. वर्षभराचा टॅक्स ॲडव्हान्स भरत असेल तर प्रशासनाने टँकरने पाणी दिले पाहिजे. मा.तनवाणी साहेबांनी सुरू केलेल्या मोफत जलप्याऊ येथुन दहा वार्डातील नागरीकांनी पाणी बुक केले होते. कोणत्याही अधिकाऱ्यानी संवाद साधला नाही.

**कार्य.अभियंता (श्री.कोल्हे)**:दिड दिवसांचा शेडयुल विस्कळीत झाला होता.

**मा.सभापती** :अधिकाऱ्यांनी संबधीत स.नगरसेवकांच्या संपर्कामध्ये राहावे. प्रशासनाने नागरीकांच्या स.सदस्यांच्या संपर्कात राहणे गरजेचे होते.

**कार्य.अभियंता (पा/पू)** :स.सदस्यांच्या भावना रास्त आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :संबधीत नगरसेवकांशी योग्य समन्वय ठेवायला पाहिजे होता. पाणी देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**श्री.समीर राजुरकर** :नागरीकांना पाणी द्यायचे नाही हे मान्य नाही. योग्य नाही.

**कार्य.अभियंता (पा/पू)** :कर्मचाऱ्यांना याबाबतीत सूचना देण्यात येतील की, अशी परिस्थिती असल्यास त्यांनी स.सदस्यांच्या संपर्कात राहावे.

**मा.सभापती** :संबधीत नगरसेवकांच्या संपर्कामध्ये प्रशासनाने राहावे.

**श्री.समीर राजुरकर** :टॅक्सपे एरियामध्ये प्रशासनाने टँकर पुरवायला पाहिजे होते.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :पाण्याची परिस्थिती गंभिर आहे.

**श्री.नारायण कुचे** :सलिम अली सरोवराच्या बाजुला साडेपाच हजार स्के.फुटवर काही लोकांनी मुरूम टाकुन अतिक्रमण केले आहे. वर्तमानपत्रामध्ये याबाबतीत बातमी आलेली आहे. प्रशासन यास मदत करीत आहे. दिशाभुल करण्याचे काम काही अधिकाऱ्यांचे आहे. श्रीमती प्रियंका केसरकर, प्रशासकीय अधिकारी यांनी दोन जणांना नोटीसा दिलेल्या आहेत. बी.डी.पटेल यांना नोटीस दिल्यात त्यांचा काहीही संबध नाही.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी** :साहनी आणि पटेल या दोघांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. पटेल यांची शाळा आणि घर त्या ठिकाणी आहे. गार्डन करण्यात आलेले आहे

**श्री.नारायण कुचे** :पटेल यांनीच गार्डन, अतिक्रमण केले हे कशावरून

**श्री.रेणुकादास वैद्य** :साहनी आणि पटेल यांना प्रशासनाने नोटीसा दिलेल्या आहेत परंतु सदरील जागा बळकविण्यात मझहर खान हा व्यक्ती आहे. याबाबतचे कागदपत्र आमच्याकडे उपलब्ध आहेत. मझहर खान यांचे नावाने पिआरकार्ड आहे. भाडेपट्टयावर सदरील जागा घेण्यात आलेली आहे आणि त्याचे पिआरकार्ड बनविण्यात आलेले आहे. परंतु दिनांक 08.04.2011 रोजी याची नोंद रद्द करण्यात आलेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी** : याबाबतचे कागदपत्र प्रशासनाकडे आलेले नाही.

**श्री.रेणुकादास वैद्य** : मझहर खान यांना नोटीस देण्याऐवजी दुसऱ्याच व्यक्तींना नोटीस बजावण्यात आली आहे.

**प्रशासकीय अधिकारी** :सलिम अली सरोवर येथे अतिक्रमणाची तक्रार आल्यानंतर श्री.जमशेद, इमारत निरीक्षक (सध्या निलंबीत) यांना त्या ठिकाणी पाठविण्यात आले.

**श्री.रेणुकादास वैद्य** :श्री.जमशेद यांना प्रशासनाने नोटीस देण्यासाठी पाठविण्यात आले होते. श्री.जमशेद यांना निलंबीत करण्यात आले.

**प्रशासकीय अधिकारी** :सदर प्रकरणात जमशेद यांना निलंबित केले नसुन दुसऱ्या प्रकरणात त्यांचेवर कारवाई झालेली आहे.

**श्री.नारायण कुचे** :श्री.जमशेद यांनीच अतिक्रमणास मदत केलेली आहे. प्रशासकीय अधिकारी त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करतात. बीआयवर व ज्यांनी भर टाकलेली आहे त्या दोघांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे.

**प्रशासकीय अधिकारी** :इमारत निरीक्षक यांनी जी माहिती दिली त्याआधारे दोघांना नोटीस बजावण्यात आली आहे.

**श्री.नारायण कुचे** :वस्तुस्थिती समोर येणे आवश्यक आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे का?

**प्रशासकीय अधिकारी** :प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे. साहणी याचे रेस्टॉरंटचे न्यायालयीन प्रकरण चालु आहे. याच्यापुर्वीही भर टाकुन वाढविलेले आहे. पटेल यांचे म्हणण्यानुसार त्यांचे वडीलोपार्जीत गार्डन आहे. सिडकोने त्यांना 10 वर्षाच्या करारा करीता संभाळण्यासाठी दिलेले आहे. परंतु कागदपत्र उपलब्ध करून दिलेले नाही. मनपाच्या ॲक्टनुसार 478 ची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

**श्री.नारायण कुचे** :स.सभापती आणि सदस्यांनी स्थळ पहाणी कराण्यात यावी. संबधीतांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे.

**मा.सभापती** :13 तारखेत याबाबत बातमी आलेली आहे. याबाबत प्रशासनाने गंभिरतेने प्रकरण हाताळले पाहिजे. स.सदस्यांकडे असलेले कागदपत्रे प्रशासनास उपलब्ध करून देण्यात यावे.

**प्रशासकीय अधिकारी** :कारवाई करण्यासंदर्भातील संचिका मा.आयुक्तांकडे पाठविण्यात आलेली आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:वर्तमानपत्रामध्ये सलिम अली सरोवर येथे भर टाकुन अतिक्रमणाचे फोटो येत आहे परंतु प्रशासन गंभिर नाही. अतिक्रमण होत असेल तर तात्काळ कारवाई करायला पाहिजे.

**मा.सभापती** :महापालिकेचे नुकसान होता कामा नये. उद्या सकाळी 11 वाजता पहाणी करण्यात येईल.

**श्री.समीर राजुरकर** :सिडको उपआयुक्त पदाचा चार्ज कुणाकडे दिलेला आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :सिडको उपआयुक्त पदाचा चार्ज श्री.शिवाजी झनझन यांचेकडे देण्यात आलेला आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:प्रशासन पदाधिकारी यांना विश्वासात न घेता निर्णय घेतात. दोन दिवसांपुर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली की, रस्ता रूंदीकरणात बाधीत नागरीकांना प्लॉट अलॉटमेंट होणार आहे. नागरीकांच्या सुविधेकरीता सभागृहाने हर्सुल येथे 500 जणांना राहण्याची सोय व्हावी म्हणुन फ्लॅट सिस्टीमला मंजूरी दिली होती. 23 जानेवारी रोजी भुमिपूजन व्हावे अशी अपेक्षा सभागृहाने व्यक्त केली होती. पॉलिसी मॅटर आहे स.पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन प्रशासनाने निर्णय घ्यायला पाहिजे होता. औरंगपुरा संभाजीपेठ, पैठणगेट, कैलासनगर, येथील रस्ता रूंदीकरण करतांना प्रापर्टी हस्तगत केल्यात नागरीकांनी भरभरून मदत केलेली आहे. परंतु अजुनही त्या भागातील काही नागरीकांचे पंचनामे झालेले नाहीत मोबदला अदा केलेला नाही. प्रशासनास विनंती आहे की, कुठलेही पॉलिसी मॅटरची अंमलबजावणी करत असतांना स.पदाधिकारी,गटनेता यांना विश्वासात घ्यावे. माहिती देण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :जो मुद्दा उपस्थित केला तो रास्त आहे. भुखंड देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. विषय धोरणात्मक होता मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक होती. प्रशासनाने परस्पर निर्णय घेतला ते योग्य नाही. जुन्या शहरातील रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत नागरीकांना न्याय मिळालेला नाही. साफसफाईचे काम पुर्ण झालेले नाही. रस्ते मोठे झाले पाहिजे या मताशी सभागृह प्रशासनाच्या पाठीशी आहे. एक रस्ता घेतल्यावर तो पुर्णपणे पुर्णत्वास न्या कामे पुर्ण करा त्यानंतर दुसरा रस्ता हाती घेण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर**:सभागृहाने मंजूर केलेले सिटीएस नंबर व साईटस् आहे फ्लॅट सिस्टीम आहे ते कुठल्याही परिस्थितीत रद्द होता कामा नये. त्या ठिकाणी अपार्टमेंट झाले पाहिजे. जास्तीत जास्त लोकांना राहाता आले पाहिजे. इतर ठिकाणी प्लॉट वाटल्यास काही हरकत नाही.

**मा.सभापती** :फ्लॅटचे नियोजन कुठल्याही प्रकारे रद्द होता कामा नये. मार्कींग एरियामध्ये व्यत्यय होता कामा नये. धोरणात्मकबाबीं विषयी प्रशासनाने स.पदाधिकारी यांना विश्वासात घ्यावे.

**श्री.समीर राजुरकर** :महाविरनगर,उस्मानपुरा महापालिकेच्या ओपनस्पेसला लागुन लेआऊटमध्ये एका व्यक्तीने प्लॉट घेवुन बेटरमेंट,सिटी डेव्हलमेंट चार्जेसची भरणा केली. 7.500 स्के.फुट जागेवर xyz व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे. दि.7.3.2012 रोजी टाऊन प्लॅनिंग विभागाला पत्र दिले की, अतिक्रमण चेक करून काढण्यात यावे. दि.07.03.2012 रोजी सहा.संचालक नगर रचना विभागाने प्रशासकीय अधिकारी यांना

पत्र दिले की, तुकाराम भिका यांनी मनपाच्या खुल्या जागेवरील अतिक्रमण काढण्याविषयी अर्ज दिलेला आहे. त्या व्यक्तीच्या प्लॉटवर व मनपाच्या खुल्याजागेवरील अतिक्रमण संदर्भांत सहा महिन्यांपासून पाठपुरावा करीत आहे. परंतु अतिक्रमण काढण्यात येत नाही. पिआर कार्डवर त्यांचे नांव आहे. तत्कालिन उपआयुक्त सिडको यांनी या विषयी चर्चा केलेली आहे. अतिक्रमण का काढण्यात आले नाही.

उपआयुक्त (सिडको) :संबधीताचे अर्ज बरेचशे आलेले आहेत. ले आऊटचा प्लॉट आहे. पाच ते सहा व्यक्तींनी अतिक्रमण केलेले आहे. शेजारी महानगरपालिकेचे अतिक्रमण आहे. त्यावरही अतिक्रमण करण्यात आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :उद्या 12 वाजेपर्यंत सर्व अतिक्रमण निष्कासित करण्याचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती :मा.न्यायालयाचा स्टे आहे का?

उपआयुक्त (सिडको) :याबाबत माहिती नाही.

श्री.समीर राजुरकर :सन 2000 पासून सदर व्यक्ती सतत अतिक्रमण काढण्यासाठी पाठपुरावा करीत आहे. त्याच्या जागेमधून ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेली आहे.

मा.सभापती :बेटेरमेंट, सिटी डेव्हलेपमेंट चार्जेस भरण्यात आलेले आहे का?

प्रशासकीय अधिकारी :याबाबत माहिती घेण्यात येईल.

मा.सभापती :कुठलाही लिगल स्टे नसल्यास अतिक्रमण निष्कासित करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर:ओपनस्पेसवरील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :आरसीएच कर्मचारी यांचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आलेला आहे माहिती देण्यात यावी.

श्री.बाळुलाल गुजर :आरसीएचचा ठराव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे का?

श्री.समीर राजुरकर :86 लिंकवर्करला ऑक्टोबर पासून पगार दिलेला नाही 1100 ते 1200 रूपयांवर लिंकवर्कर काम करतात.

मा.सभापती :आरसीएच अधिकारी यांनी खुलासा करावा. संबधीत अधिकारी सभागृहात उपस्थित नाही. संबधीतांना नोटीस देण्यात यावी

आस्थापना अधिकारी-1 :दिनांक 09.05.2012 रोजी महासभेमध्ये आरसीएचच्या 41 कर्मचाऱ्यांना शासनाकडुन 100 टक्के अनुदान मिळेल या अटीवर तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबद्दल मान्यता देण्यात आली होती. दिनांक 23 जानेवारी 2013 रोजी शासनाने 100 टक्के अनुदान द्यावे या अटीवर तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

श्री.नारायण कुचे :तत्कालिन आयुक्त यांनी संचिकेवर काही शेरा दिला आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :याबाबत आस्थापना विभागास माहिती नाही. महासभेच्या मंजूरीनुसार शासनाने 100 टक्के अनुदान द्यावे या अटीवर तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

मा.सभापती :तत्कालिन आयुक्त यांनी काही शेरा दिला आहे का माहिती देण्यात यावी.

**आस्थापना अधिकारी-1** :मुदतवाढ व इतर बाबींशी विभागाचा संबध नाही. महासभेत ठराव मंजूर झाला होता तो ठराव करून शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

**श्री.नारायण कुचे** :संचिकेवर मान्यता न घेता ठराव शासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्यात येतो. सर्वसाधारण सभा, स्थायी समितीची मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही का?

**आस्थापना अधिकारी-1** :संचिका आरसीएच विभागाकडुन चालविण्यात येतो. संबधीत विभागाकडुन माहिती प्राप्त होऊ शकते. ठराव पाठविण्यासाठी आस्थापना विभागाकडे आलेला आहे.

**मा.सभापती** :आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदरील विषय लपविण्यात आलेला आहे.

**श्री.नारायण कुचे** :18 महिन्याची मुदतवाढ द्या म्हणुन दिलेले आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :आदेश काढण्यात आलेले नाही.

**मा.सभापती** :आरोग्य विभागाने आस्थापना विभागातर्फे ठराव शासनाकडे पाठवितांना तत्कालिन आयुक्तांनी दिलेल्या शेराबाबत माहिती देणे आवश्यक होते.

**श्री.नारायण कुचे** :ठराव पाठवितांना आरोग्य विभागाचा अभिप्राय घेण्यात आला का?

**आस्थापना अधिकारी-1** :काहीही लिहीलेले नाही. आरोग्य अधिकारी यांच्या मंजूरी शिवाय मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव येणार नाही.

**मा.सभापती** :तत्कालिन मा.आयुक्त श्री.कुणाल कुमार यांनी संचिकेवर काही शेरा मारलेला आहे का? याबाबतची माहिती घेण्यात यावी. आरोग्य विभागाचे आरसीएच प्रमुख यांनी पुढील बैठकीत सदरील विषयाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री.बाळुलाल गुजर** :दिनांक 1 एप्रिल 2012 ते 20 जानेवारी पर्यंत किती रक्कम वसुल झाली आणि किती बाकी आहे. याबाबतची माहिती देण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :पाणीपट्टीची वसुली योग्यरित्या करण्यात आलेली नाही.

**मा.सभापती** :याबाबतची लेखी माहिती देण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :लॉटरी व्यवसायावर एलबीटी आकरण्याबाबतची माहिती देण्यात यावी.

**एलबीटी कक्ष प्रमुख** :दिनांक 22 जानेवारी 2012 रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती परंतु संबधीत व्यक्ती सुनावणीस उपस्थित राहु शकले नाही. पत्राद्वारे त्यांनी तारीख वाढविण्याची विनंती केली परंतु प्रशासनातर्फे त्यांना एक आठवडयात सर्व कागदपत्रासह माहितीसह उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे. चार वेळेस सुनावणीची संधी दिल्यानंतर कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनाला आहे त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**श्री.समीर राजुरकर** :ऑन लाईन लॉटरी आणि कागदोपत्री लॉटरी असे लॉटरीचे दोन प्रकार आहे. कागदोपत्री लॉटरीला 100% एलबीटी लावु शकतो.

**श्री.बाळुलाल मुंडे** :80 टक्के भरणा केलेल्या गुंठेवारी भागात विकास करण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्याबाबत मा.महापौर, मा.सभापती, सर्व पदाधिकारी, पत्रकार आणि सभागृहाचे अभिनंदन करण्यात येते.

**श्री.रेणुकादास वैद्य** :भोगवटा प्रमाणपत्राच्या अहवालाबाबत मुख्यलेखापरिक्षक यांना चौकशी करण्याचे आदेशित केले होते याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मुख्यलेखा परिक्षक** :सर्व संचिका चौकशी करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. स्थळ पहाणीचा भाग झालेला आहे. रिपोर्ट फायनलायझेशन बाकी आहे. लवकरच अहवाल देण्यात येईल. मेघा प्रोजेक्टच्या मार्च 2012 मध्ये ज्यांना कंम्पलिशन दिलेल्या आहे तेवढयाच संचिका आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :अहवाल सादर करतांना यामध्ये दोषी असणाऱ्यांचे नांवे स्पष्ट देण्यात यावी. कुठल्या कलमाआधारे शास्ती लावता येईल याबाबत नमुद करण्यात यावे

**मुख्यलेखा परिक्षक** :जे दोष आढळतील ते कुठल्या नियमाआधारे आहे त्याचा सपोर्ट अहवालामध्ये लिहीण्यात येईल. ज्यांनी ज्यांनी संचिका हाताळली आहे त्यांचे नांवे त्यामध्ये येतील.

**श्री.रेणुकादास वैद्य** :कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी यांना दोषी दाखविले जाते आणि वरिष्ठ दर्जाचे अधिकारी सुटून जातात असे होता कामा नये. अहवालामध्ये स्पष्टपणा असावा.

**मा.सभापती** :ज्यानी काम केलेले आहे तोही दोषी आहे.दोन्ही बाजुंनी अहवाल देण्यात यावा कोणत्याही विभाग प्रमुखाला सोडण्यात येवु नये.

**श्री.समीर राजुरकर** :गेल्या स्थायी समितीमध्ये सिध्दार्थ गार्डनचे टिकीट घराचे आणि तेथे लागणाऱ्या वॉचमनचे आऊटसोर्सिंग संदर्भात ठराव पारित करण्यात आला होता. त्यावेळेस एक दुरूस्ती सूचवायची होती, परंतु अनावधानाने सुचविता आली नाही. एका वर्षाचे किंवा तीन महिण्याचे पैसे घेण्यापेक्षा एक महिण्याचे ॲडव्हान्स रक्कम घ्यायची व दर महिण्याला पुढच्या महिण्याचे ॲडव्हान्स रक्कम घ्यायची त्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीत दरमहिण्याच्या महिण्याला रक्कम जमा होईल. एक महिण्याचे ॲडव्हान्स पैसे भरले पाहिजे अशी दुरूस्ती करण्यात यावी.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी सूचविलेल्या दुरूस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**<u>विषय क्र. 136 :</u>** (विषय क्र. 116 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 10/01/2013 (का.प.क्र.22) (दि.05/01/13 ची तहकुब) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 136 स्थगीत.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 137 :</u>** (विषय क्र. 117 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 10/01/2013 (का.प.क्र.22) (दि.05/01/13 ची तहकुब) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती :विषय क्रमांक 137 स्थगीत**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 138 :**

**कार्यकारी अभियंता वॉर्ड अ व ड महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे ए.सी. बसविणे बाबत अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष नवीन व जुन्या इमारतीत विद्युतीकरण करणे मधुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.51,81,130/- मे. बॉम्बे रेफ्रीजरेशन कंपनी यांनी दिलेल्या ब्ल्यु स्टार कंपनीच्या कोटेशन दरानुसार करण्यात आले असून मा.आयुक्त महोदय यांनी दि.07/11/2012 रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.**

**करीता रक्कम रू.51,81,130/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देणेस्तव प्रस्ताव सादर.**

**श्री.समीर राजुरकर :संत एकनाथ रंगमंदिर, सिडको नाटयगृह यांचे नाटकाचे वन टाईम डिपॉझिट देणेबाबत वारंवार सभेत मागणी करत आहे.**

**मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी पत्र काढुन तात्काळ याबाबतचे पत्र काढण्यात यावे विषय मंजूर करण्यात येतो.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे ए.सी. बसविणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.51,81,130/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 139 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.26 सिडको अंतर्गत एन-8 भागातील गायत्री सोसायटी आणि विनायक सोसायटी दरम्यानची सिडको प्रशासनाने बांधलेली किमान 20 वर्षापुर्वीची जुनी दगडी मोडकळीस आलेली, बहुतांश ठिकाणी पडलेली अरूंद गटार तोडुन नविन आर.सी.सी. स्टॉर्म वॉटर ड्रेन बनविण्यासाठी कामाचे सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 च्या जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.59,95,000/- चे अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 रोजी विषय/ठराव क्र.905 अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. मान्यते उपरान्त सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकच निविदा मे. नाज डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची प्राप्त झाली आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी नाज डेव्हलपर्स यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 139 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.26 सिडको अंतर्गत एन-8 भागातील गायत्री सोसायटी आणि विनायक सोसायटी दरम्यानची सिडको प्रशासनाने बांधलेली 20 वर्षापुर्वीची जुनी दगडी अरूंद गटार तोडुन नविन आर.सी.सी. स्टॉर्म वॉटर ड्रेन बनविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.नाज डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 140 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला गारखेडा भागातील वॉर्ड कार्यालय (फ) येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील मालखरे व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (1) भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.दादाराव नाथराव ठाकुर यांनी विनंती केली आहे. अर्जदाराने अर्जासोबत अर्जदार एस.टी. प्रवर्गातील असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 13.20 चौ.मी. एवढे आहे. सदर गाळा वार्ड कार्यालयाचे वापरात होता. सदर गाळा वापरासंबंधाने वार्ड अधिकारी गाळा भाडे तत्वावर देणे बाबत संमती दिल्याने सदर गाळा भाडे तत्वावर देण्यात येत आहे. सदर गाळयांचे मासिक भाडे या वर्षाचे शिघ्र गणकाआधारे रू.3,060/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. अर्जदाराचे मागणी संबंधाने अर्जदारास सदर दुकान भाडे तत्वावर देणे बाबत प्रशासकीय मान्यता झाली आहे. करीता अर्जदार श्री.दादाराव नाथराव ठाकुर यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.3,060/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहुन सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 140 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गारखेडा भागातील वॉर्ड कार्यालय (फ) येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील मालखरे व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (1) क्षेत्र 13.20 चौ.मी. अर्जदार श्री.दादाराव नाथराव ठाकुर यांनी विनंती केल्यानुसार त्यांना सदर दुकान रू.3,060/- प्रतिमाह भाडे आकारून व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा

**शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 141 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार गांधी पुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार रक्कम रूपये 65,68,159/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक 20/04/2012 विषय क्र.717 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकापेक्षा 36% जास्त दराची एक निविदा प्राप्त झाली. कंत्राटदारास दर कमी करणेसाठी कळविण्यात आले असता त्यांनी त्यास नकार दिला. सदर जलनिःसारण वाहिनीचे काम पावसाळयापूर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलाविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून 31% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची दराचे वाटाघाटीनुसार 36% जास्त ऐवजी 31% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.नारायण कुचे** :या ठिकाणी एमआयडीसीचाच डिएसआर का वापरण्यात आला खुलासा करण्यात यावा. दोन ठिकाणी दोन डिएसआर का वापरण्यात आले. सन 2011-12चाच डिएसआर का वापरतो याबाबत खुलासा करण्यात यावा.

**शहर अभियंता** :रस्ता रूंदीकरणामध्ये ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम हाती घेतलेले आहे. ड्रेनेज लाईनचे इस्टीमेट करत असतांना चिनी मातीचे पाईपचे दर दुसऱ्यामध्ये आठ ते दहा वर्षापुर्वीचे दर आजही तसेच ठेवलेले आहे. त्याच्यामुळे याचे दर 50 ,60 70 टक्के अबोव्ह जायचे एमआयडीसीच्या डिएसआरमध्ये हा रेट आहे तो रेट घेतल्यामुळे टेंडर मिळते.

**श्री.नारायण कुचे** :माझ्या वार्डात काम चालू आहे. त्याठिकाणी चिनी मातिचे पाईप वापरले जात नाही. सर्वांना समान वागणुक द्यायला पाहिजे.

**श्री.बाळासाहेब मुंढे** :संबधीताने काम करून दिले म्हणुन त्याच्या म्हणण्यानुसार डिएसआर देता का?

**श्री.गिरजाराम हाळनोर**:शहरात इतर ठिकाणी कोणता डिएसआर लावण्यात येतो.

**शहर अभियंता** :दिड ते दोन वर्षापासुन एमआयडीसीचा डिसीआर वापरण्यात येतो. हा शासनाचा डिसीआर आहे.

(याच वेळी अनेक स.सदस्य एकत्र बोलतात.)

**श्री.गिरजाराम हाळनोर**:मनपामध्ये कोणता डिएसआर वापरतो, दोन दोन लाखांचे कामे स.नगरसेवकांच्या वार्डात होत नाही. 36 टक्के above दिले जातात. ही पैशाची उधळपट्टी आहे.

**मा.सभापती** :सभागृहाच्या भावनेप्रमाणे शहरात सर्व कामांना एकच डिएसआर वापरण्यात यावा. जो योग्य असेल तो वापरण्यात यावा. विषय क्रमांक 141 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार गांधी पुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून 36% जास्त ऐवजी 31% जास्त दराने करून घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शहागंज चमन विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार रक्कम रूपये 58,70,397/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनाक 20/04/2012 विषय क्रमांक 716 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

1. उदय इंजिअरींग वर्क्स - अंदाजपत्रका पेक्षा 36% जास्त
2. श्री.अ.कदीर शे.रहीम - अंदाजपत्रका पेक्षा 45% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रका पेक्षा 36% जास्त दराची उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा आहे. सदर जलनिःसारण वाहिनीचे काम पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलाविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून 31% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची दराचे वाटाघाटीनुसार 36% जास्त ऐवजी 31% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शहागंज चमन विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून 36% जास्त ऐवजी 31% जास्त दराने करून घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 143 :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या संगणकीकरणासाठी ERP Solution (Enterprise Resource Planning Base Solution) योजना अंमलात आणण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.291/11 दिनांक 11/08/2006 नुसार मान्यता झाली. निविदा प्रक्रिये अंती SAP ह्या संगणकीय प्रणालीची निवड महानगरपालिकेने केली असून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गरजेनुसार SAP Software Customization & Implementation ची जवाबदारी M/s CMC Ltd. ह्या मध्ये लेखा, अस्थापना, मालमत्ता व अभियांत्रिकी विभाग या चार मुख्य विभागाचे संगणकीकरण करण्याचे नियोजित होते. प्रत्यक्ष कामास जुलै 2007 पासून सुरूवात झाली आहे. यामध्ये खालील प्रमाणे कामाचे टप्पे आहेत.

| अ.क्र. | टप्पा | कामाचे स्वरुप | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| 1. | Project Preparation | प्रकल्पासाठी प्राथमिक तयारी करणे, आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करुन देणे. | काम पूर्ण |
| 2. | Business blueprint | महानगरपालिकेच्या सद्यस्थितीतील कामकाजाची माहिती घेणे व ते संगणकीय प्रणालीमध्ये कशाप्रकारे करता येईल याचा अभ्यास करणे. | काम पूर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | **Realization** | महापालिकेचे कामकाज व गरजेनुसार संगणकीय प्रणाली तयार करणे, तयार केलेली संगणकीय प्रणाली वापरण्या योग्य आहे काय, काही बदल/दुरुस्त्या आवश्यक आहेत काय याची पडताळणी करणे | काम पूर्ण |
| 4. | **Final Preparation** | महानगरपालिकेच्या गरजेनुसार संगणकीय प्रणाली तयार झाल्यावर आवश्यक माहिती जमा करणे व ती संगणकीय प्रणालीमध्ये जतन करणे, संगणकीय प्रणाली हाताळणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी. | काम पूर्ण |
| 5. | **Go-live and support** | संगणकीय प्रणालीवरुन दैनंदिन कामकाजास सुरुवात करणे व सुरळीत कामकाजासाठी मदत करणे. | दिनांक 25/06/09 रोजी कार्यान्वीत तथापी प्रत्यक्ष कामास सुरवात झालेली नाही. |

**1 या प्रकल्पासाठी संगणक साहित्यावर रू. 92 लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.**

**2 ईआरपी प्रणाली विकसित करण्यांसाठी निविदेतील नमुद टप्प्यानुसार सुमारे रू.131 लक्ष खर्च करण्यांत आलेला आहे.**

**ईआरपी प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत**

**अ स्थानिक वर्तमान पत्रातुन टिका टिप्पणी झाली आहे.**

**ब महाराष्ट्र विधी मंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाने शासनास लेखी हमी दिली आहे.**

**क महालेखाकार, नागपुर यांनीही प्रकल्पास होणाऱ्या विलंबा बाबत लेखा परिक्षण अहवालात आक्षेप नोंदविलेला आहे व रू.2.23 कोटीची रक्कम दोन वर्षाहून अधिक काळाकरिता निष्फळ गुंतवून ठेवले बाबत नमूद केली आहे.**

**ड औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेतही चर्चा होवून आठ दिवसात संगणकणीय कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत आदेश झाले आहेत.**
**(मा.सर्वसाधारण सभा दिनांक 18.8.2009)**

**5 राज्य व केंद्र शासनाने निर्देशीत केलेल्या मुख्य अनिवार्य सुधारणा (Mandatory Reforms) पैकी कार्यालयीन कामाकाजाचे संगणकीकरण ही एक मुख्य अनिवार्य सुधारणा आहे.**

**M/s CMC Ltd. च्या मदती (support) शिवाय संगणकीय कार्यप्रणालीचा सुरळीत व कार्यक्षमपणे वापर करणेही शक्य नाही, ही बाब विचारात घेवून M/s CMC Ltd. यांनी दिलेला प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे.**

**Post Go live Support साठी वर्षासाठी ठरलेल्या रकमेत म्हणजे**

**1 Product annual maintanance Charges Rs. 7,82,000/-**

**2 Support for 1 year after golive Rs. 32,00,000/-**

**अशा एकूण रूपये 40 लक्ष रक्कमेत M/s CMC Ltd. एक महिना अधिकचा support देण्यास तयार असून या 13 महिन्यापैकी पहिल्या महिन्यात सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी संगणकीय यंत्रणेची परिपूर्ण तपासणी करून, काही बदल अथवा दुरूस्त्या आवश्यक असल्यास त्या करून घेवून सर्व Mile Stone Certificate म्हणजे नियोजीत टप्प्यांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी करणे व यंत्रणा वापरण्या योग्य असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक राहील. या एक महिन्याच्या कालावधीत संबंधित विभाग प्रमुखांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास तयार करण्यात आलेल्या संगणकी यंत्रणे बाबत काही अडचण नाही व संगणकीय यंत्रणा वारण्या योग्य आहे असे गृहीत धरून पुढील एक वर्षाचा Post Go Live Support सुरू झाला असे मानण्यात येईल.**

**वरील प्रस्ताव पाहता जरी पहिल्या एक पहिल्या महिन्याच्या कालावधीत संबंधित विभाग प्रमुखांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केली नाही व Mile Stone Certificate नियोजीत टप्पे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी केले नाहीत, तरी संबंधित विभागाचे काम पूर्ण झाले आहे, व संबंधित विभागास संगणकीय यंत्रणा**

**कार्यान्वित करण्यास कुठलीही अडचण नाही, असे गृहीत धरण्यात येवून M/s CMC Ltd. यांना उर्वरित अंदाजे 33 टक्के देयक म्हणजे सुमारे 70.00 लक्ष रूपये अदा करणे क्रमप्राप्त होईल असा प्रस्ताव M/s CMC Ltd. यांनी दिला आहे.**

**<u>ईआरपी प्रकल्पासाठी आवश्यक आर्थिक तरतुद</u>**

**1. ERP Software + Cutomization+Networking.**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | ERP Software + Cutomization साठी कार्यादेशनुसार M/s CMC Ltd. यांना अदा करावयाची रक्कम. | रू. 92,00,000/- |
| 2 | Hardware साठी कार्यादेशनुसार M/s Monarch Technology पुणे यांना अदा करावयाची रक्कम. | रू.2,00,000/- |
| 3 | Networking साठी कार्यादेशनुसार M/s Alphanso Netsecure पुणे यांना अदा करावयाची रक्कम. | रू.3,00,000/- |
| | एकूण | रू. 97,00,000/- |

**1. System Annual Maintenance साठी अपेक्षित प्रति वर्ष लागणारा खर्च**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | ERP Software + Customization Annual Support | रू. 44,00,000/- |
| 2 | Hardware Maintenance Annual Support | रू.9,00,000/- |
| 3 | Networking Maintenance Annual Support | रू.60,000/- |
| 4 | Online UPS साठी नविन Batteries चा खर्च (Batteries दर 3 वर्षांनी बदलाव्या लागतात). | रू. 6,00,000/- |
| | एकूण वार्षीक खर्च | रू. 59,60,000/- |

वरील सर्व बाबींवर मा.आयुक्त यांनी, शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगर रचना, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, सिस्टीम मॅनेजर (ई-गर्व्हनन्स) यांच्या समिती मार्फत अहवाल मागविला असता पुढील प्रमाणे शिफारसी या समितीने केल्या आहे.

**<u>शिफारसी</u>**

1 या प्रकल्पावर मोठया प्रमाणावर भांडवली खर्च झालेला आहे. याचा वापर होणे आवश्यक आहे. करिता हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यांसाठी संबधित विभाग प्रमुखांना विहित कालावधीत हे काम सुरू करण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी.

2 ERP प्रकल्प यशस्वी करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी यांनी संगणकीय प्रणालीतच काम करावे. मॅन्युअल काम करण्यांत येवू नये या बाबत प्रशासना मार्फत आदेश निर्गमित करण्यांत यावे.

3 ERP Implimentation करणारी एजन्सी M/s CMC Ltd. यांनी सद्या कार्यान्वित करण्यांत आलेले KDMC चे application Software शी Intigration करून घेण्याबाबत आदेशित करावे.

4 **ERP विभागाने आवश्यक ते Sap User Licence, Online UPS, Networking, Hardware, ERP Software, विद्युत पुरवठा ई. बाबतची व्यवस्था ERP Implimentation साठी संबंधित Module Head (विभाग प्रमुख) व Core Team Members (संबंधित कर्मचारी) यांना उपलबध्द करून दयावे.**

5 **ERP विभागाने M/s CMC Ltd. यांचे कडून महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार application Software मध्ये आवश्यक ते custmization करून घ्यावे.**

6 **प्रकल्पासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदी बाबत मुख्य लेखाधिकारी यांचे अभिप्राय घेवून M/s CMC Ltd. ने दिलेल्या प्रस्तावानुसार Post Go Live Support साठी वर्षासाठी ठरलेल्या रक्कमेत म्हणजे**

**1 Product annual maintanance Charges Rs. 7,82,000/-**

**2 Support for 1 year after go live Rs. 32,00,000/-**

**अशा एकूण रूपये 40 लक्ष रक्कमेत M/s CMC Ltd. एक महिना अधिकचा support ऐवजी चार महिने अधिकचा support देण्यास बाध्य करावे पैकी पहिल्या दोन महिन्यात सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी संगणकीय यंत्रणेची परिपूर्ण तपासणी करून, काही बदल अथवा दुरुस्त्या आवश्यक असल्यास त्या करून घेवून सर्व Mile Stone Certificate म्हणजे नियोजीत टप्प्यांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी करणे व यंत्रणा वापरण्या योग्य असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक राहील. या दोन महिन्याच्या कालावधीत संबंधित विभाग प्रमुखांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास तयार करण्यात आलेल्या संगणकीय यंत्रणे बाबत काही अडचण नाही व संगणकीय यंत्रणा वापरण्या योग्य आहे गृहीत धरून पुढील एक वर्षाचा Post Go Live Support (अतिरिक्त वाढीव दोन महिन्यांसह) सुरू झाला असे मानण्यात येईल अशी परिपूर्ण कल्पना संबंधित विभाग प्रमुखांना देवून पहिल्या दोन महिन्याच्या कालावधीत सर्व Mile Stone Certificate म्हणजे नियोजीत टप्प्यांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी करणे यंत्रणा वापरण्या योग्य असल्याबाबत प्रमाणित करणे बंधनकारक करणे योग्य राहील. लागणाऱ्या अतिरिक्त खर्चास आवश्यक मान्यता घेण्यात याव्यात.**

**करिता ईआरपी प्रकल्प अंमलबजावणी बाबत वरील प्रमाणे सविस्तर अहवाल मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. तसेच वरील प्रस्तावात नमुद खर्चास मान्यता मिळवण्यासाठी मा.स्थायी समिती समोर सादर.**

**<u>संवाद :</u>**

**श्री.रेणुकादास वैद्य :विषयाबाबत खुलासा करण्यात यावा.**

**मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov):सर्वसाधारण सभा दिनांक 11.08.2006 च्या ठरावानुसार सॅप प्रणाली महापालिकेत लागु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. याचे प्रमुख पाच टप्पे आहेत.**

| अ.क्र | टप्पा | कामाचे स्वरूप | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| 1 | **Project Prepartation** | प्रकल्पासाठी प्राथमिक तयारी करणे, आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देणे. | काम पूर्ण |
| 2 | **Business blueprint** | महानगरपालिकेच्या सद्यस्थितीतील कामकाजाची माहिती घेणे व ते संगणकीय प्रणालीमध्ये कशाप्रकारे करता येईल याचा अभ्यास करणे | काम पूर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | Realization | महापालिकेचे कामकाज व गरजेनुसार संगणकीय प्रणाली तयार करणे, तयार केलेली संगणकीय प्रणाली वापरण्या योग्य आहे काय, काही बदल/दुरूस्त्या आवश्यक आहेत काय याची पडताळणी करणे | काम पूर्ण |
| 4 | Final Preparation | महानगरपालिकेच्या गरजेनुसार संगणकीय प्रणाली तयार झाल्यावर आवश्यक माहिती जमा करणे व ती संगणकीय प्रणालीमध्ये जतन करणे, संगणकीय प्रणाली हाताळणाऱ्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादि. | काम पूर्ण |
| 5 | Go-live and support | संगणकीय प्रणालीवरून दैनंदिन कामाकाजास सुरूवात करणे व सुरळीत कामकाजासाठी मदत करणे. | दिनांक 25.06.09 रोजी कार्यान्वित तथापी प्रत्यक्ष कामास सुरूवात झालेली नाही. |

**श्री.समीर राजुरकर** :टप्पा क्रमांक 5 नंतर किती अधिकारी कर्मचारी यांनी प्रणालीचा वापर केलेला आहे.

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov)** :कुणीही याचा वापर केलेला नाही.

**श्री.रेणुकादास वैद्य** :चार विभागांचे कामकाज पुर्ण झालेले असुन सदरील विभागाचे काम या प्रणालीद्वारे सुरू झालेले आहे का?

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov)** :प्रत्यक्ष वापर सुरू करण्यात आलेला नाही.

**श्री.रेणुकादास वैद्य** : मालमत्ता विभागाचे सर्व रेकॉर्ड स्कॅन करून प्रणालीमध्ये टाकण्यात आलेले आहे का ?

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov)** :प्रणालीविषयी सर्व माहिती टाकण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष वापरसुरू केल्यानंतर सर्व रेकॉर्डबाबत माहिती मिळण्यास सुरू होईल. जे सॉफ्टवेअर आहे ते मालमत्ता विभागाशी निगडीत आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :तत्कालिन आयुक्त श्री.असीम कुमार गुप्ता यांच्या कार्यकाळात मी सभापती असतांना मंजुरी मिळालेली आहे. पेपरलेस ऑफिस करण्याबाबत उद्देश होता. विभागातील संगणकांना नेट कनेक्टही करण्यात आलेले नाही. सन 2007 पासून काम चालू आहे जवळपास यावर 2 कोटी रूपये खर्च करण्यात आलेले आहे. प्रणाली कार्यान्वित होणे गरजेचे आहे त्याशिवाय प्रशासन योग्यरीत्या चालणार नाही. याबाबत सभागृह सहमत आहे. कंपणीचे आजपर्यंत जे काम केलेले आहे त्याचे नियमानुसार देयक अदा करण्यात यावे. नव्याने निवीदा प्रक्रीया करून चांगल्या एजन्सीला काम देण्यात यावे. टाईमबॉन्ड काम करण्याची अट टाकण्यात यावी. ऑनलाईन न झाल्यास देयक अदा करण्यात येणार नाही. ही अटही टाकण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :अधिकारी/कर्मचारी यांना ट्रेनिंग देवुनही प्रणाली राबविण्यात येत नसेल तर जनतेच्या पैशाचा हा दुरूपयोग आहे. कंपणीने एका वर्षाचे पिरेड दिला होता या एका वर्षात कंपणीने ट्रेनिंग पुर्ण करून अधिकारी कर्मचारी यांना प्रणाली राबविता यायला पाहिजे होते. कंपणीचा टाईमपिरेड संपल्यानंतर सांगण्यात येते की, अधिकारी कर्मचारी यांना

**काम करता येत नाही. महापालिकेतील कोणत्याही अधिकाऱ्याला ईआरपी ॲक्टीव्हेट करता येत नाही. कंपणीचे देयक देतांना शाहनिशा करण्यात यावी की, एक वर्षाची ट्रेनिंग कुणाला,कधी दिली याबाबतची डाटा एट्री आहे का? हे सर्व बाबी तपासून देयक देण्यात यावे.**

**शहर अभियंता :मनपाचे कामकाज पेपरलेस होण्यासाठी सुरवातीस चार विभागाची निवड करण्यात आली होती. यांत्रिकी, मालमत्ता, आस्थापना, लेखा विभाग सदरील काम दोन वर्ष चालले. अभियांत्रीकी विभाग कसा चालतो कामकाज कसे चालते याबाबतची माहिती घेवुन प्रणालीमध्ये टाकण्यात आलेली आहे. परंतु अधिकारी कर्मचारी यांनी प्रत्यक्ष काम केलेले नाही. टप्पा क्रमांक 5 दिनांक 25.06.2009 रोजी कार्यान्वित केले तेव्हा हे अपेक्षित होते की, विभागाने अभ्यास केला, आत्मसात केले. दुर्देवाने तसे झालेले नाही. कुठल्याही विभागाने त्यावर काम केलेले नाही. त्यामुळे प्रणाली तशीच पडलेली आहे. यापुढे प्रणाली चालु करायची असेल तर सिएमसी सपोर्ट करण्यास तयार आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेची ही अत्यावश्यक गरज आहे. पाच टप्प्यापैकी एकही टप्पा पुर्ण केलेला नाही. त्यामुळे देयक देतांना नेमके काय काम केलेले आहे. त्याचेच देयक देण्यात यावे. पाच ते सहा वर्ष झालेले आहे काम झालेले नाही. त्यामुळे सदरची एजन्सी महापालिकेला नको. दुसऱ्या एजन्सीला बोलविण्यात यावे व तशा प्रकारचा प्रस्ताव पुढील सभेत आणण्यात यावे.**

**मा.सभापती :एजन्सीने केलेल्या कामामुळे विभाग संतुष्ट आहे का?**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :इआरपीची प्रणाली मोठी आहे. सॉफ्टवेअर योग्य आहे.**

**मा.सभापती :किती खर्च करण्यात आला.**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :2 कोटी 23 लाख रूपये खर्च करण्यात आलेले आहे. वापर करण्यात आलेला नाही.**

**श्री.रेणुकादास वैद्य :श्री.बारी, सिस्टीम मॅनेजर (E-Gov) यांचे यात काहीही दोष नाही. त्यांनी चार विभागास वारंवार प्रणाली वापरण्याबाबत विनंती केली. परंतु अधिकारी/कर्मचारी यांचे मानसिकतेमुळे प्रणालीचा वापर झालेला नाही. टेक्निकल विभागाने सपोर्ट न केल्यामुळे काम रखडले आहे. श्री.बारी हे त्यांचे विभाग म्हणुन ते संतुष्ट आहे. सॉफ्टवेअर लोड करण्यात आलेले आहे. त्यांचे विभागापुरते काम पुर्ण झालेले आहे. सॉफ्टवेअरचा वापर करणे हे त्यांच्या हातात नाही अधिकारी/कर्मचारी यांनी वापर केल्याशिवाय प्रणाली चालूच शकत नाही. दोन कोटी खर्च करून प्रणाली कार्यान्वित करत नसेलतर ही गंभिरबाब आहे. ऑडिट विभागाने त्रृटी काढल्यामुळे विषय ठेवण्यात आला. येत्या तीन चार महिन्यामध्ये पेपरलेस कशा पध्दतीने होईल याकडे लक्ष देण्यात यावे.**

**मा.सभापती :यापुढे जायचे आहे का?**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :चार विभागाचे काम पुर्ण झाले आहे. सॉफ्टवेअर उपलब्ध करण्यात आलेले आहे. वापर करण्याची मानसिकता नाही. दिनांक 25.06.2009 ला रेडी होते.**

**मा.सभापती :नविन Version आले असेल. प्रशासनाचे नियोजन काय आहे.**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :मानसिकता असेल तर वापर करता येवु शकेल.**

**मा.सभापती :वापर करू शकतो का?**

**शहर अभियंता :अधिकारी कर्मचारी यांनी वापर केल्यास व कंपनीच्या तज्ञ मंडळींनी सहकार्य केल्यास.**

**मा.सभापती :कंपणीचे कर्मचारी ट्रेनिंग देण्यास येवु शकतात का?**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :प्रस्ताव देण्यात आलेला आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य :वापर करणाऱ्यास सोपे असावी. अद्यायावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा आता इथे हे थांबविण्यात यावे.**

**कार्य.अभियंता (पा/पु) :याबाबत यशस्वी व अयशस्वीतेची जबाबदारी सर्वांची आहे. पाचव्या टप्प्यात गेले म्हणजे सर्व विभागांनी आपआपल्या विभागाची माहिती दिलेली आहे. प्रणालीमध्ये जी गुंतागूंत आहेत त्या सोप्या व्हाव्यात. सॉफ्टवेअर हे युजर फ्रेंडली असले पाहिजे. इआरपी ही आवश्यक बाब आहे. ती वापरात आली पाहिजे.**

**मा.सभापती :सन 2009 पासून प्रशासनाची धारणा का झाली नाही.**

**कार्य.अभियंता (पा/पु) :सर्व विभागांशी लिंक केलेले आहे. सर्वांनी वापरल्यास याचा उपयोग होईल एका विभागापुरता हा मर्यादित नाही. विभागाने वापरण्यास सुरवात केली होती परंतु लेखा विभागातुन तसा प्रतिसाद मिळायला पाहिजे. इआरपीला जायला पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. युझर फ्रेंडली असली पाहीजे.**

**मा.सभापती :जे झाले आहे त्यास कोण जबाबदार.**

**कार्य.अभियंता (पा/पु) :ही सामुदायिक जबाबदारी आहे.**

**मा.सभापती :सन 2009 नंतर 2013 रोजी सदरचा विषय हाती घेण्यात आलेला आहे. वापरात आणणे आवश्यक आहे.**

**शहर अभियंता :वापरात आणण्यासाठी तज्ञांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.**

**सिस्टीम मॅनेजर (E-Gov) :अधिकारी कर्मचारी यांना ट्रेनिंग दिलेली आहे.**

**मा.सभापती :वापर कसा करायचा याबाबत निर्णय कसा घेता येईल.**

**शहर अभियंता :पुढे इआरपी चालविण्यासाठी आर्थिक तरतुद लागणार आहे.**

**श्री.समीर राजुरकर :एक वर्षाची ट्रेनिंग प्रशासनाने घेतलेली नाही. प्रशासनाच्या मानसिकतेमुळे प्रणाली वापरात आलेली नाही. नागरीकांचे पैशांचे नुकसान होत आहे. कंपणीच्या तज्ञांसमेवेत मनपाचे तज्ञ अधिकारी, स.सदस्य मिळुन जॉईंट बैठक घेण्यात यावी यातुन मार्ग काढण्यात यावा.**

**मा.सभापती : संबधीत कंपनीचे तज्ञांना बोलावुन सर्व विभाग प्रमखांसोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. या विषयावर निर्णय घेण्यात येईल. ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येतात.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्तावा संबंधी संबधीत कंपनीचे तज्ञांना बोलावुन सर्व विभाग प्रमखांसोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे सर्वानुमते ठरले.**

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 144 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे कॉँक्रीट करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,99,823/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली असुन, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | मे. ए.एस. कंस्ट्रक्शन | 10.00 % जास्त दराने |
| 2. | मे. रूद्रा कन्स्ट्रक्शन | 11.00 % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. ए.एस. कंस्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00 % जास्त आहे.

तथापी वाटाघाटी अंतर्गत मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 % जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. करीता मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे कॉँक्रीट करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 145 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे कॉँक्रीट करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.3998339/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली असुन, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | मे. ए.एस. कंस्ट्रक्शन | 10.00 % जास्त दराने |
| 2. | मे. रूद्रा कन्स्ट्रक्शन | 11.00 % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00 % जास्त आहे.

तथापी वाटाघाटी अंतर्गत मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 % जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. करीता मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे काँक्रीट करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. ए. एस. कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 146 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,423/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली असुन, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तिनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | मे. रूद्रा कन्स्ट्रक्शन | 10.00 % जास्त दराने |
| 2. | मे. ए.एस. कंस्ट्रक्शन | 11.00 % जास्त दराने |
| 3. | श्री. एम.ए. सिद्दीकी | 15.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. रूद्रा कंस्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00 % जास्त आहे.

तथापी वाटाघाटी अंतर्गत मे. रूद्रा कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 % जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. करीता मे. रूद्रा कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.85 अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. रूद्रा कंस्ट्रक्शन यांचेशी झ ालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद